# अथर्ववेदातील औषधी वनस्पती आणि त्यांचे रोगानिवारणात्मकता: एक अभ्यास शोधनिबंध सादरकर्ते

**डॉ. मंजुश्री श्रीपाद नेव्हल[1], डॉ. आनंद रामू सुकेणकर[2]**

[1]सहाय्यक प्राध्यापक, बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

[2]बी ए एम एस; एम डी; पी जि पी पी; डी वाय ए;, पी एच डी (स्कॉलर), पी एम टी आयुर्वेद कॉलेज, शेवगांव.

**सारांश**

या शोधनिबंधाच्या निमित्ताने अन्वेषणाचा केंद्रबिंदू म्हणजे - आयुर्वेदाच्या परंपरेत औषधी वनस्पतींचा शोध घेणे, त्या वनस्पतींचे स्वरूप व गुणधर्म समजून घेणे, तसेच कोणत्या व्याधींवर त्यांचा उपयोग प्राचीन काळी केला जात होता हे शोधणे. विशेषतः अथर्ववेदात वर्णन झालेल्या कुशा, अपामार्ग, दर्भ, अश्वत्थ, हरिद्रा, नीम, अर्जुन, पिंपळी, सुंठ, सोम इत्यादी वनस्पतींच्या उल्लेखांचा संदर्भ आधुनिक वैद्यकीय व आयुर्वेदीय दृष्टीने त्यांच्या औषधी उपयोगांचे अध्ययन करण्याची आवश्यकता आहे.

या संशोधनातून निदर्शनास येते अथर्ववेदातील औषधी वनस्पतीमध्ये प्रामुख्याने - ज्वर, कृमी, व्रण, स्त्रीरोग, हृदयरोग, कुष्ठ, मानसिक विकार अशा विविध व्याधींवर उपयुक्त असल्याचे वर्णन आढळते. आयुर्वेदाच्या द्रव्यगुणशास्त्र परंपरेशी तुलना केल्यास या वनस्पतींचे गुणधर्म आजही तितकेच प्रभावी असल्याचे लक्षात येते. आधुनिक संशोधनाच्या संदर्भात हरिद्रा (हळद) याचे प्रतिजैविक व दाहशामक गुणधर्म, नीमाचे जीवाणुनाशक गुण, अर्जुनाचे हृदयसंरक्षक इत्यादी औषधी वनस्पतींच्या गुणांचे महत्त्व अधोरेखित होते.

**सूचक शब्द :-** आयुर्वेद, अथर्ववेद, व्याधी, औषधी वनस्पती, चिकित्सा

**प्रस्तावना :-**

भारतीय ज्ञानपरंपरेचा वैभवशाली वारसा म्हणजे वेद साहित्य होय. या वेदसाहित्यामध्ये अथर्ववेदाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, कारण हा केवळ आध्यात्मिक विचारांनी सीमित न राहता प्रत्यक्ष जीवनातील व्यवहार्य विषयांवरही सखोल प्रकाश टाकणारा ग्रंथ आहे. अथर्ववेदात आरोग्य, औषधोपचार, रोगप्रतिबंध आणि जीवनरक्षण या विषयांवर आधारित सूक्ते आहेत. या वेदामध्ये औषधी वनस्पतींना दैवी स्वरूप देऊन त्यांचे मनुष्याच्या आरोग्यरक्षणातील स्थान अधोरेखित करण्यात आले आहे.

अथर्ववेदात आयुर्वेद संदर्भातील विविध वनस्पतींचा उल्लेख येतो. या वनस्पती केवळ औषध म्हणून नव्हे, तर विशिष्ट रोगांविरुद्ध प्रभावी शस्त्र आहेत. त्या वनस्पतींना मंत्रांद्वारे उद्देशून त्यांची चिकित्सा शक्ती जागृत करण्याचा प्रयत्नही करण्यात आलेला आहे. हे सूचित करते की वैदिक ऋषी वनस्पतींच्या औषधी गुणधर्मांबाबत अत्यंत जागरूक होते आणि त्यांनी त्या गुणधर्मांचा उपयोग रोग निवारणासाठी प्रभावी पद्धतीने केला.

या शोधनिबंधात अथर्ववेदातील औषधी वनस्पतींचे स्वरूप - म्हणजे त्याचे प्रकार, वर्णन, गुणधर्म - यांचे सविस्तर विश्लेषण केले जाईल. त्याचबरोबर त्या वनस्पतींचा विविध व्याधींवरील उपयोग, विशेषतः शारीरिक व मानसिक रोगांविरुद्ध वापराचा अभ्यास केला जाईल. या माध्यमातून वैदिक काळातील आरोग्यसंकल्पना, रोगोपचार पद्धती आणि औषधी विज्ञान यांचा प्राचीन परंपरेतील संदर्भाने सुसंगत अभ्यास मांडण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला जाईल.

आज वैद्यकशास्त्र विविध समस्यांमुळे नैतिक व पर्यावरणीय प्रश्नांशी सामना करत आहे, तेव्हा वैदिक औषधी ज्ञानाचा अभ्यास अधिक मोलाचा ठरतो. त्यामुळे अथर्ववेदातील औषधी वनस्पती आणि त्यांचा रोगनिवारणात्मक उपयोग यांचा अभ्यास केवळ ऐतिहासिकदृष्ट्या नव्हे, तर समकालीन आरोग्यविचारांच्या संदर्भातही उपयुक्त ठरतो. अशा व्यापक दृष्टिकोनातून या शोधनिबंधाचे स्वरूप ठरवले गेले आहे.

**संशोधन पद्धती** :- या शोधनिबंधात मुख्यतः ग्रंथाधिष्ठित व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**व्याप्ती व मर्यादा:-** या शोधनिबंधात केवळ अथर्ववेदातील औषधी वनस्पतींचा आणि व्याधींचा विचार केला आहे. वनस्पतींचे औषधी गुणधर्म, त्यांचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम, तसेच त्यांच्या उपयोगाचे वैदिक मंत्रशास्त्रीय तत्त्व यांचा अभ्यास समाविष्ट आहे. शारीरिक तसेच मानसिक व्याधींवर उपयोगी ठरणाऱ्या वनस्पती विचार केला गेला आहे. आधुनिक वैद्यकशास्त्र व आयुर्वेदातील अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु केवळ समर्थनार्थ, नव्हे तर संदर्भ स्पष्ट करण्यासाठी.

या शोधनिबंधाचा अभ्यास फक्त अथर्ववेदावर केंद्रित आहे; ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेदातील औषधी वनस्पतींचा विचार या अभ्यासात समाविष्ट नाही. वनस्पतींची वैज्ञानिक ओळख ही पूर्णपणे अचूक व स्पष्ट करणे अनेकदा कठीण जाते, कारण वैदिक काळातील संज्ञा व आजच्या वनस्पतींची नावे यात अनेकदा तफावत आढळते. सर्व औषधी वनस्पतींचा वैद्यकशास्त्रीय चिकित्सात्मक प्रयोग हा प्रत्यक्षात अभ्यासाच्या व्याप्तीबाहेरचा विषय आहे, त्यामुळे तो संक्षिप्त स्वरूपात मांडलेला आहे. अथर्ववेदातील मंत्रांमध्ये असणारी आध्यात्मिक किंवा प्रतीकात्मक भाषा ही अनेकदा प्रत्यक्ष औषधोपचारापेक्षा मनोवैज्ञानिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून विचारली जाते; त्यामुळे त्या मंत्रांचा प्रत्यक्ष चिकित्साशास्त्राशी असलेला संबंध काही अंशी अनुमानाधारित ठरतो.

**उद्दिष्टे :-**

- अथर्ववेदातील औषधी वनस्पतींचा शोध घेणे
- औषधी वनस्पतींचे स्वरूप विशद करणे
- व्याधी व त्यावरील वनस्पतींचा उपयोग समजावून घेणे
- वैदिक औषधी परंपरेचे आधुनिक संदर्भात मूल्य अधोरेखित करणे

**विषयविवेचन :-**

अमरकोशात वृक्षाला पर्यायी शब्द वृक्ष, विटपिन, पादप, तरू, अनोकह, कुट, शाल, पलाशिन, द्रुद्रुम, अगम, नग, अग, शिखरिन, अद्रि, विष्टर, धव असे सांगितले आहेत[१]. अथर्ववेद हा वैदिक वाङ्मयाचा असा भाग आहे ज्यामध्ये केवळ आध्यात्मिक किंवा याग-यज्ञसंहिताच नसून प्रत्यक्ष मानवजीवनाच्या व्यवहार्य समस्यांचा, विशेषतः आरोग्य व व्याधी निवारणाच्या उपायांचा सविस्तर निर्देश मिळतो. यामध्ये औषधी वनस्पतींना 'दैवी शक्ती' असलेले सजीव तत्त्व मानून त्यांच्या गुणधर्मांबाबत उल्लेख केला आहे. म्हणूनच, "अथर्ववेदात उल्लेखिलेल्या औषधी वनस्पतींची ओळख पटवणे" हे शोधनिबंधाचे मूलभूत उद्दिष्ट ठरते.

औषधी उत्पत्तीचे जमीन आणि समुद्र अशी दोन स्थाने अथर्ववेदात सांगितली आहेत[२]. सामुद्रिक कर्म करून पाण्यातून औषधी द्रव्य प्राप्त करता येते. ही समुद्रातून प्राप्त होणारी औषधी आस्राव व्याधी म्हणजेच मूत्रस्राव आणि वीर्यस्राव यासाठी उत्तम आहे. सामुद्रिक औषधींमध्ये आयुर्वेदानुसार प्रवाळ, मोती, शंख, शौक्तिक, कपर्दिका इत्यादी औषधींचा समावेश होतो.

औषध हे दूषित जल वापरातून उत्पन्न झालेले रोग, दूरवचन अथवा शापजन्यरोग, यमाचे पाशस्वरूप उत्पन्न रोग आणि पापजन्य रोग यापासून रक्षण करणारे आहे; हे औषधांचे कार्यकारीत्व सांगितले आहे[३]. या औषधीवनस्पतीचा अधिपती अग्निदेवता असल्याचे सांगते[४].

**औषधी वनस्पती आणि व्याधीमुक्ती :-**

'शरणमक'[५] या वनस्पतीला मुंज किंवा सरकंड असे लौकिक भाषेत म्हणतात. ही वनस्पती क्रोध आणि वासना यांना दूर करणारी आहे[६]. या वेदात कथन केलेल्या सर्व वनस्पतीं ह्या बहुमुत्रादीसार आणि मूत्रकृच्छ्र या व्याधींना नष्ट करणाऱ्या आहे[७]. अथर्ववेदात मधुवनस्पती[८] म्हणून उसाचा उल्लेख मिळतो. ज्याच्या सेवनाने शरीरात मधुरता उत्पन्न होते. शारीरिक आणि मानसिक माधुर्य निर्माण करण्यास ही सहाय्यक आहे. 'पाटा'[९] वनस्पती कृमीघ्न म्हणजेच कृमीनाशक असल्याचे म्हटले आहे. ही वनस्पती अपथ्य करणाऱ्यांचा व्याधी नष्ट करण्यास गुणकारी सांगितली आहे.

'दूर्वा'[१०] ही वनस्पती पापोत्पन्न कृतीला नष्ट करणारी आणि शापविनाशक असल्याने हिला 'वीरुत' म्हटले आहे. ही 'वीरुत' वनस्पती म्हणजेच दुर्वा होय. कांडा[११] वनस्पतीचा ही जमिनीवर उत्पन्न होणारी दुर्वा वनस्पती आहे. कांडाप्रमाणे असल्याने या वनस्पतीला 'कांडा' असे म्हटले आहे.

'वचा'[१२] नामक वनौषधी शरीरातील दृश्य अदृश्य स्वरूपातील कृमींचा नाश, मांडींच्या सांध्यातील आजार व कंप व्याधी यासाठी उपयुक्त आहे. वचा ही वनस्पती आंत्र, शीर आणि फुफ्फुस यामध्ये असणाऱ्या किटाणूंना नष्ट करणारी आहे[१३]. मृगशृंग[१४] ही औषधी अनुवंशिक रोगांना नष्ट करणारी आहे. अनुवंशिक रोगात राजयक्ष्म, कुष्ट, प्रमेय म्हणजेच diabetes हे व्याधी समावेशित आहेत.

'अरुस्त्राण'[१५] नामक औषधाचे स्थान डोंगरातील दऱ्यांमध्ये असून त्याचा वापर त्वचेवरील पिकलेल्या फोडाला नष्ट करण्यासाठी केला जातो. 'ऋषभक'[१६] औषधी वनस्पतीच्या बीजसेवनाने उत्तम पुत्रोत्पत्तीची प्राप्ती आणि मातेत पर्याप्त दुग्धोत्पत्ती होण्यास लाभदायक सांगितली आहे. आयुर्वेदात 'प्रजास्थापक गणात' या वनस्पतीचा समावेश केला आहे. 'ऋषभक'[१७] ही वनस्पती वीर्यवर्धक आणि बलकारी असते असे सांगितले आहे.

'रोहिणी'[१८] वनस्पती तुटलेल्या हाडांना जोडण्यासाठी उपयोगाची आहे. मांस धातूचा ध्वंसीत भाग रोहिणी वनस्पतीच्या उपयोगाने परस्परांना जोडला जातो. या वनस्पतीने अस्थि, मज्जा, मांस, त्वचा हे सर्व परस्परांसह जोडल्या जाते. आयुर्वेदानुसार विविध प्रकारच्या अस्थिभग्नात रोहिणी वनस्पतीचा उपयोग केला जातो. पाण्यावर तरंगणारे मशकादी कीटकांचे विष, हवेत असणारे रोग निर्माण करणारे कृमी यांच्या विषाला नष्टकरण्यासाठी 'अजशृंगी' या वनस्पतीचा उपयोग करण्यास सांगितले आहे[१९]. आयुर्वेदानुसार विषमज्वरासाठी या वनस्पतीचा उपयोग केला जातो. येथे अजशृंगी ला काकडशृंगी असेही म्हटले आहे. ही

वनस्पती लता स्वरूपाची असते. 'रोहिणी' ही वनस्पती पसरणारी, सर्व दिव्यगुणांनी युक्त, पुरुषाला जीवन देणारी या सर्व गुणांनी युक्त असणारी अथर्ववेदात सांगितली आहे[२०].

'मधु'[२१] नामक वनस्पती औषधी ही सर्पदंशावर विषनाशक म्हणून कार्य करणारी आहे. ही औषधी मधुररस उत्पन्न करणारी आहे; याशिवाय ही वनस्पती मशकांचा नाश करणारी आहे. 'आपामार्ग'[२२] ही वनस्पती शापजन्य रोगांसाठी, मुर्च्छा, पापजन्य आजार, रक्तादी शोषण करणाऱ्या व्याधींसाठी उपयुक्त सांगितली आहे. ही वनस्पती मांस भक्षण करणाऱ्या कृमींचा नाश करते. वाईट स्वप्नांच्या नाशासाठी, अर्शव्याधी म्हणजेच मूळव्याधसाठी देखील 'आपामार्ग' या वनस्पतीचा उपयोग सांगितला आहे. तहान भूक कमी झाली असल्यांसाठी, अपत्य नसलेल्यांसाठी, इंद्रियांमध्ये शिथिलता निर्माण झालेली असल्यांसाठी या वनस्पतीचा उपयोग सांगितला आहे. वंशपरंपरागत संक्रमित आजारांना दूर करण्यासाठी देखील 'अपमार्ग' वनस्पती उपयुक्त आहे. ही वनस्पती पाप, शाप, रोगादी दोषांना दूर करणारी म्हटले आहे[२३]. काळेदात, कुनख, वीरूपता या सर्वांवर अपामार्ग वनस्पती उपयुक्त आहे[२४]. 'गुग्गुळ' या औषधीचा सुगंध कोणत्याही रोगाला जवळ येऊ देत नसल्याचा संदर्भ अथर्ववेदातील 'यक्ष्मनाशनम्' या सूक्तात येतो -

न तं यक्ष्मा अरुन्धते नैनं शपथो अश्नुते |
यं भेषजस्य गुल्गुलोः सुरभिर्गन्धो अश्नुते ||[२५]

अर्थात ज्याच्या जवळ औषधी रूप गुगुळाचा सुगंध राहतो त्या मनुष्याजवळ यक्ष्मा येत नाही; अभिशाप त्याला स्पर्श करत नाही.

सर्व रोगावर गुणकारी असणारी ही औषधी केवळ स्पर्शाने रोगाला हरीण आणि अश्वाच्या द्रुतगती प्रमाणे दूर नेणारी आहे. गुग्गुल धुपाच्या गंधाने यक्ष्मानाशाचा उल्लेख येतो .

'कुष्ट'[२६] नामक वनस्पतीला आयुर्वेदात कचोरा म्हटले आहे. ही वनस्पती तक्मनाशक म्हणजेच ज्वरनाशक असते. ही वनस्पती हिमालयात उत्पन्न होत असून या वनस्पतीचा उपयोग नेत्रादि इंद्रियांसाठी लाभदायक आहे. प्राण, व्यान या वायूच्या विकृतीतून उत्पन्न होणाऱ्या व्याधींचा नाश करणारी आणि ज्वरनाशक आहे. ही शिरोवेदना, नेत्ररोग, पापजन्य रोग, वर्षाकालीन आजार आणि दैवी प्रकोपजन्य आजारांसह पौरुषत्व वाढवण्यासाठी देखील ही वनस्पती उपयुक्त आहे. ही शोधक वनस्पती आहे, रक्त शुद्ध करणारी आहे. हिला अथर्ववेदात 'विश्वभेषज'[२७] अर्थात संपूर्ण औषधी असेही म्हटले आहे. ही औषधी दिवसातून तीन वेळा सेवन केल्याने व्याधी नष्ट होते. ही हिमालयावर उत्पन्न होणारी वनस्पती आहे. 'कुष्ठनाशनम्' सूक्तात या औषधी वनस्पतीचा उल्लेख येतो -

'एतु देवस्त्रायमाण: कुष्ठो हिमवतस्परि तक्मानं सर्वं नाशय सर्वाश्च यातुधान्यः ||'[२८]

कुष्ठरोगापासून रक्षण करणारी, दिव्य गुणांनी युक्त, आहे. ही औषधी सर्वप्रकारच्या विकारांना, ज्वरादी सर्व व्याधींना नष्ट करणारी आहे. याशिवाय

'शीर्षलोकं तृतीयकं सदन्दिर्यश्च हायन: |
तक्मानं विश्वधावीर्याधराञ्च परा सुव ||'[२९]

हे कुष्ठ औषधी ! तिसऱ्या दिवशी येणाऱ्या ज्वराला, शिरोव्याधीला, सदैव दु:खदैण्याने त्रस्त असणाऱ्या रोगाला, सर्वांगाला दुखावा उत्पन्न करणाऱ्या व्याधीला, कष्टप्रद ज्वराला तू नष्ट कर.

अथर्ववेदात 'लाक्षा' या वनस्पतीला 'सिलाची'[३०] म्हटले आहे. ही वनस्पती आरोग्यदायी, आघातजन्य व्रण किंवा शुल यासह दोन वस्तूंच्या मध्ये रगडल्या गेल्याने झालेल्या इजेसाठी, त्याचप्रमाणे बाणाने झालेल्या घावावर उपयुक्त ठरते. 'अर्जुन'[३१] वृक्षाने प्रसन्न मन, शरीराला बल आणि शरीराचे धारण होते. आयुर्वेदात हृदय विकार याच संदर्भाने अर्जुन वृक्षाचे महत्त्व सांगितले जाते. तौविलीक[३२] नामक ही औषधी शक्तीवर्धक असून रोग विनाशक आहे; तर 'एलव' नामक औषधीत शरीरातील दीर्घकालीन व्याधीला नष्ट करण्याची क्षमता आहे.

शमीवर उत्पन्न झालेल्या पिंपळवृक्षाचा औषधीद्रव्य म्हणून उपयोग पुंसवन संस्कारात करण्यास अथर्ववेदाने सांगितले आहे[३३]. हा शमीवृक्ष अथर्ववेदानुसार केशवर्धक आहे[३४]. 'मुनी'[३५] नामक वनस्पतीचे मूळ लाल गंडमाला यावर वापरण्यास सांगितले आहे. गंडमाला व्याधीत क्रोध आणि मनोविकार उत्पन्न होतात. याकरिता क्रोध आणि मनोविकार यावरील उपचारास प्राधान्य दिले आहे. अथर्ववेदात मिठापेक्षा स्रावी आणि शरीर शुष्क करणारा गंडमाला हा व्याधी ग्रीवा म्हणजेच मान, काख आणि गुप्तस्थान या शरीरांगाच्या स्थानी होतो[३६].

'सहस्रपर्णी'[३७] औषधीवनस्पतीने सौभाग्य वृद्धी, दोष नाश आणि हृदय शुष्क अर्थात हृदय आकाराने लघु करण्यासाठी महत्त्वाची आहे. 'वीर्यवर्धिका'[३८] नामक वनस्पती औषधीचे कार्य हृदयासाठी आहे. 'पिंपळी'[३९] ही औषधी वनस्पती विक्षिप्त चित्त, वातविकार, महाव्याधी म्हणजेच वातविकार यासाठी उपचारात्मक आणि आरोग्यदायक आहे. ज्या व्यक्तीला क्षीणता अथवा थकवा आलेला आहे अथवा वातविकाराने ग्रस्त आहे तिच्याकरिता उपयुक्त आहे. 'अपराजिता' औषधीला या वेदात 'अनाधृष'[४०] म्हटले आहे. ही वनस्पती केस वाढविणारी आणि केसांना दृढ अर्थात जाड करणारी आहे. कुष्ठव्याधीसाठी अश्वत्थ[४१] म्हणजेच पिंपळ या वृक्षाची उपयोगिता अथर्ववेदाने सांगितली आहे, तर तिचे साल वापरण्याचे आयुर्वेदिक चिकित्सेत प्राधान्य आहे. हिमालयात उत्पन्न होणारी 'अमृतपुष्पनामक'[४२] औषधी देखील या व्याधीचा नाश करणाऱी आहे. 'दर्भ'[४३] वनस्पती क्रोध शामक वनस्पती आहे. या वनस्पतीच्या उपयोगाने सकारण आणि अकारण निर्माण झालेल्या क्रोधाचा नाश होतो. मृत्यूपासून उत्पन्न होणाऱ्या भयाच्या निवृत्तीसाठी दर्भमणी बंधनाचा उपचारात्मक उल्लेख अथर्ववेदात येतो[४४]. दर्भ ही नष्ट न होणारी, हजारो पर्णांनीयुक्त असणारी; औषधींमध्ये श्रेष्ठ असणारी; प्रबलशक्ती संपन्न असणारी औषधी दीर्घायु देणारी, शिरोव्याधी आणि हृदयव्याधीवर उत्तम असल्याचे अथर्ववेद सांगते -

'नास्य केशान् प्र वापन्ति नोरसि ताडमाघ्नते |
यस्मा अच्छिन्नपर्णेन दर्भेण शर्म यच्छति ||'[४५]

अर्थात अच्छींन्न पर्ण असणारे, सुख देणारे अशा दर्भाच्या सेवनाने मृत्यू त्याच्या केसालाही हानी पोहोचवू शकत नाही आणि वक्षस्थलाला हानी पोहोचविणाऱ्या हृदय रोगाला नष्ट करते.

'वरण' नावाची यक्ष्माव्याधीला नष्ट करणारी वनस्पती अथर्ववेदाने सांगितली आहे[४६]. 'वरण'[४७] ही औषधी रोगरुपी शत्रूचा नाश करणारी आहे. ही वनस्पती धारण केल्याने शतायूची प्राप्ती आणि ओजवर्धन करणारी आहे.

आरोग्यजन्य सुखाच्या विस्तारासाठी सदैव हरित राहणारी, जीवन देणारी, रोगाला नष्ट करणारी, हानीपासून दूर ठेवणारी, रक्षण करणारी, बलवर्धक असणारी 'जीवंती'[४८] नामक जीवन देणाऱ्या औषधीचे आवाहन दीर्घायुच्या प्राप्तीसाठी महत्त्वाची मानली आहे. ही औषधी वनस्पती जीवनदायिनी, रोग दूर करणारी, रक्षण करणारी, बलवर्धिनी आहे. 'पूतुद्रु'[४९] औषधी ही तेजवर्धक आहे; रोग किटाणूला नष्ट करणारी आहे; अमिवा नामक रोग किटाणूची विनाशक असणारी आहे. ही अग्निवर्धक वनौषधी अमिवा नामक रोग नष्ट करते[५०]. वैयाघ्र[५१] नामक औषधी ही रोगजन्य हानीपासून रक्षण करणारी आहे.

**सामुहिक उपयोगात येणाऱ्या वनस्पती :-**

रामा, कृष्णा आणि असिक्णि[५२] वनस्पती मधील रामा, कृष्णा या दोन तुळशीचे प्रकार आहेत, तर असिक्णि म्हणजे पिंपळी, हरिद्रा आणि सुंठ याप्रमाणे असणारी रक्तशोधक वनस्पती आहेत. पृष्णपर्णी[५३] या वनस्पतीला आयुर्वेदात 'पिठवन' म्हटले आहे. या वनस्पतीने प्रबलरोग अर्थात वातादिव्याधी, कुष्ठरोग नष्ट करता येतो. कुष्ठरोगाला 'दूर्णाम'[५४] म्हटले आहे. ज्याप्रमाणे पक्षाचे मस्तक सहजतेने कापल्या जाते त्याप्रमाणे हा व्याधी बरा होण्यासाठी पृष्णपर्णी वनस्पती गुणकारी ठरते. पृष्णपर्णी ही वनस्पती कुष्ठ, यकृतविकार आणि किटाणूंपासून होणाऱ्या व्याधींसाठीही गुणकारी ठरते; याचप्रमाणे ही वनस्पती गर्भकर अर्थात गर्भाची वाढ करणारी आहे. गर्भोत्पत्ती करण्यास सहाय्यक ठरणारी आहे. शामाशिवाय रामा, कृष्णा, असिक्णि या तीन औषधीं किलास, पलित या रोगाला नष्ट करण्यासाठी उपयुक्त आहे[५५]. किलास आणि पलित या रोगात श्वेत वर्ण आणि श्वेतबिंदू त्वचेवर उमटतात.

'वैष्णवी' आणि 'तारका' या दोन वनस्पतींचा उल्लेख येतो[५६]. वैष्णवी वनस्पती ही तेजवर्धक आहे, तर तारक वनस्पती ही अनुवंशिक व्याधींचा नाश करणारी आहे. उदाहरणार्थ राजयक्ष्मा, कुष्ट व्याधी. अर्जुन वृक्षाची आंतर साल, यव, तीळ हे द्रव्य अनुवंशिक व्याधी नष्ट करणारे आहेत[५७]. अश्वत्थ म्हणजेच पिंपळ, पारिजात या वनस्पती औषधीचा उल्लेख येतो. अर्जुन, शामलवृक्ष आणि कर्करी या वनस्पती औषधींचा उल्लेख येतो[५८].

गाठी व्याधी (Gout) ला 'ग्राह्य'[५९] म्हटले आहे. या व्याधीतून मुक्त होण्यासाठी दशवृक्ष वनौषधी सांगितली आहे. आयुर्वेदात दशवृक्ष वनस्पती दशमूळ म्हणून प्रचलित आहे. दहा औषधींचा समावेश यात होतो. शालीपर्णी, पृष्णपर्णी, बृहती, कंठकारी, गोक्षुर, अग्निमंथ, शोण्याक, पाटला, गंभारी, बिल्व यांचा समावेश होतो.

गुग्गुळ, पिला म्हणजेच पिलु, नलदी, औक्षगंधी प्रमंदनी या पाच वनस्पती पाण्यातील किटाणूपासून होणाऱ्या व्याधीला नष्ट करते[६०]. याशिवाय अश्वत्थ म्हणजेच पिंपळ, न्यग्रोध म्हणजेच वड व शिखंडी ही वनस्पती पाण्यातील कृमींचा नाश करणारी आहे[६१]. कदंब, प्लक्ष, पिंपळ, धव, खदीर, भद्र, वड व पर्णवनस्पती या सर्व वनस्पती जखमा भरण्यासाठी उपयुक्त असल्याचे सांगितले आहे[६२]. तांदूळ आणि यव ही मंगलमय, कफघ्न, सुखकर, रोगनाशक आणि पापहर असणारे आहारद्रव्य आहे[६३]. पिंगबज[६४] यालाच पिलाबज असेही म्हणतात. ही बज औषधी संतती हिनतेला नष्ट करते; गर्भ नष्ट करणाऱ्या आणि गर्भातील शिशुला हानी पोहोचविणाऱ्या कृमींना ही औषधी नष्ट करणारी आहे.

**विषनाशक वनस्पती :-**

उपजीविका[६५] ही विषनाशक औषधी आहे, तर पांढरी मोहरी, तरुणक, रथबंधूर, पुरुषवार आणि अश्ववार ही औषधी सर्प विनाशक, तर कुशा नामक औषधी ही सापासाठी अग्नी प्रमाणे दाहक व शोकप्रद आहे[६६]. याशिवाय कोणत्याही विषावर 'वर्णावती'[६७] नामक वनौषधी लाभदायक असल्याचे म्हटले आहे.

**मणी नावाने निर्देशित केलेल्या औषधी वनस्पती :-**

- **जङ्गिडमणि -**

'जङ्गिड- जं उत्पन्नं रोगं गिरति नाशयतीति जङ्गिडः |' ही औषधीय गुणसंपन्न वनस्पती आहे. ही वनस्पती सुमारे दीडशे हिंसक कृमी आणि शंभर हिंसक कर्मांपासून उत्पन्न होणाऱ्या व्याधींना नष्ट करणारी आहे. हिंसक कृमीच्या प्रभावाला सत्व हीन करणारी जांगिडमणी वनस्पती आहे. ही वनस्पती वातजन्य व्याधीवर औषधी म्हणून उपयुक्त असल्याचे अथर्ववेदात सांगतात -

'स जङ्गिडस्य महिमा परिण: पातु विश्वतः |
विष्कन्धं येन सासह संस्कन्धमोज ओजसा ||'[६८]

अर्थात जंगिडमणी ची शक्ती आमचे सर्व बाजूने रक्षण करणारी राहो. याने संधिवात दूर केल्या जातो त्याचप्रमाणे संस्कंधव्याधी दूर होतो.

जङ्गिडमणि ही वनस्पती बहुविध रोगाला नष्ट करणारी असल्याचेही अथर्ववेदात म्हटले आहे -

'आशरीकं विशरीकं बलासं पुष्टयामयम् |

तक्मानं विश्वशारदमरसां जङ्गिडस्करत् ||'[६९]

अर्थात शरीरबल नष्ट करणाऱ्या, खोकल्याने ग्रस्त, पाठीचे व्याधी, शरद ऋतूत उत्पन्न होणारे ज्वर यासारख्या बहुविध व्याधींवर जंगिडमणिच्या वापराने व्याधी नष्ट करण्यास सांगतात.

- **अस्तृतमणि -** अथर्ववेदात असृतमणीचा उल्लेख येतो.

'प्रजापतिष्ट्वा बध्नात प्रथममस्तृतं विर्याय कम् |

तत् ते बध्नाम्यायुषे वर्चस ओजसे च बलाय चास्तृतस्त्वाभि रक्षतु ||'[७०]

अर्थात सर्वप्रथम ब्रह्माने शौर्याच्या आकांक्षेणे अस्तृतमणीला धारण केले. हे पुरुष ! ह्या अस्तृमणीने तुझी आयु, तेज, ओज, बल वृद्धिंगत होवो. हा अस्तृतमणी तुझा रक्षक असो. हा अस्तृतमणी मानवी आयुला दीर्घायु प्रदान करणारा, ओज, तेज, बल यांना पोषित करणारा आहे.

- **शतावारि मणि -**

'शतवारि' ही औषधी वनस्पती आहे. 'शतम् अनेकं रोगं वारयति निवारयति इति शतवारः |' आयुर्वेदात 'शतावरी' नावाच्या औषधी सह हिचा संबंध जोडता येतो. 'मणी' हा शब्द श्रेष्ठतेचा वाचक आहे. ही वनस्पती औषधी धारण करण्यास सांगितली आहे. आयुर्वेद शास्त्रानुसार काही वनस्पती या बाह्य प्रयोगासाठी वापरल्या जातात. अथर्ववेदात 'शतवारोमणि' नामक सूक्तात एकोणिसाव्या कांडात येते. नवीन व जुने असणारे व्याधी, संसर्गजन्यदोषातून उत्पन्न होणारे अशा शेकडो व्याधींवर ही उपचारात्मक औषधी वनस्पती असल्याचे अथर्ववेदात सांगतात -

'शतामहं दुर्णाम्नीनां गन्धर्वाप्सरसां शतम् |

शतं शश्वन्वतीनां शतवारेण वारये ||'[७१]

अर्थात दुष्परिणाम करणारे शेकडो रोग, गंधर्व आणि अप्सरा यांच्या संसर्गातून होणारे औपसर्गिक शेकडो व्याधी, वारंवार निरंतर कष्ट देणाऱ्या शेकडो रोगांच्या नाशाकरिता 'शतवार'नामक औषधी प्रयोगाने नष्ट करता येते.

**वनस्पतीचा उल्लेख :-**

अथर्ववेदात काही केवळ वनस्पतीचा केवळ उल्लेख येतो. ज्याचा उपयोग कोणत्या व्याधीसाठी आहे हे निश्चित करता येत नाही. पलाश म्हणजे पळस वृक्षाचा उल्लेख 'तलाशा'[७२] म्हणूनही अथर्ववेदात आला आहे. 'आबय'[७३] नामक औषधी वनस्पतीला सायनाचार्य सरसो वनस्पती या नावाने उल्लेखित करतात. अथर्ववेदात 'आसुरी'[७४] नाम वनस्पती औषधीचा उल्लेख येतो. अथर्ववेदात या वनस्पतींचा केवळ उल्लेख आढळतो त्याचा कोणत्या व्याधीवर लाभ घेण्यास उपयुक्त आहे हे निश्चित करणे कठीण आहे, तर पिंपळ, कुश, अमृत, तांदूळ, यव, सोमा ही सर्व औषधी अमर असल्याचे अथर्ववेदाने सांगितले आहे[७५].

**निष्कर्ष :-**

- अथर्वदात काही वनस्पतींचे महत्त्व हे व्याधींमुक्तीच्या योगाने कथन केले आहे. 'शरणमक', 'दूर्वा', 'वचा', 'अरुस्त्राण', 'रोहिणी', 'मधु', 'अपामार्ग,' 'गुग्गुळ,' 'कुष्ट,' 'लाक्षा', 'मुनी', 'पिंपळी,' 'अपराजिता', 'दर्भ', 'वरण', 'जीवंती', 'पूतुद्रु' ही प्रयेक वनस्पती एका विशिष्ट व्याधीसाठी उपयुक्त असल्याचे संदर्भ मिळतात.
- अथर्ववेदात काही वनस्पती ह्या अन्य वनस्पतीसह उल्लेखिल्या आहेत. रामा, कृष्णा आणि असिक्णि या त्रिविध वनस्पती; 'वैष्णवी' आणि 'तारका' या दोन वनस्पती; खदीर, अश्वत्थ म्हणजेच पिंपळ, पारिजात या त्रिविध वनस्पती औषधीचा उल्लेख; तर अर्जुन, शामलवृक्ष आणि कर्करी या वनस्पती औषधींचा उल्लेख येतो. एक दशवृक्ष वनौषधी सांगितली आहे. ज्यात शालीपर्णी, पृष्णपर्णी, बृहती, कंठकारी, गोक्षुर, अग्निमंथ, शोण्याक, पाटला, गंभारी, बिल्व या वनस्पतींचा समावेश होतो, तर गुग्गुळ, पिला, नलदी, औक्षगंधी प्रमंदनी या पाच वनस्पतीं सह; कदंब, प्लक्ष, पिंपळ, धव, खदीर, भद्र, वड व पर्णवनस्पती; तांदूळ आणि यव हे औषधी द्रव्य एकाच प्रकारच्या व्याधीवर मिश्ररूपाने कार्यकारी असल्याचे सांगितले आहे.
- अशा ही काही वनस्पती अथर्ववेदात येतात ज्या विषनाशक, सर्पनाशक स्वरूपाच्या आहेत.
- दर्भमाणी सह जङ्गिडमणि, शतावारमणि या वनस्पतींना मणी संबोधित केले आहे, तर काही वनस्पतींचा निव्वळ उल्लेख आलेला आहे.
- काही वनस्पतीचा परिचय हा आयुर्वेदात आणि सामान्य समाजात भिन्न नावाने प्रचलित ही असू शकतात; हे आयुर्वेदातील भिन्न नावाच्या उल्लेखावारू गृहीत धरता येते.

**संदर्भ सूची**

१. https://surl.lt/ycnjpt
२. अथर्ववेद २.३.५ पृ ७०
३. अथर्ववेद ६.९६.२ पृ ५७२
४. अथर्ववेद ५.२४.२ पृ ४२६
५. अथर्ववेदा १.२.१ पृ ४
६. अथर्ववेद १.२.३ पृ ५
७. अथर्ववेद १.२.४ पृ ६
८. अथर्ववेद १.३४.१ पृ ६०
९. अथर्ववेद २.२७.४ पृ ११६
१०. अथर्ववेद २.७.१ पृ ७८

११. अथर्ववेद २.७.३ पृ ७८
१२. अथर्ववेद २.३१.२ पृ १२५
१३. अथर्ववेद २.३१.४ पृ १२६
१४. अथर्ववेद ३.७.१ पृ १५३
१५. अथर्ववेद २.३.३ पृ ७०
१६. अथर्ववेद ३.२३.४ पृ २०१
१७. अथर्ववेद ४.४.४ पृ २३५
१८. अथर्ववेद ४.१२.१, ३ - ४ पृ २५६
१९. अथर्ववेद ४.३७.२ पृ ३२८
२०. अथर्ववेद ८.७.४ पृ
२१. अथर्ववेद ७.५६.१ पृ ६७८
२२. अथर्ववेद ४.१७.१,३,४-६ पृ २७४-२७५; ४.१८.७ पृ २७९
२३. अथर्ववेद ७.६५.१ पृ ६८७
२४. अथर्ववेद ७.६५.३ पृ ६८७
२५. अथर्ववेद १९.३८.१ पृ १७९
२६. अथर्ववेद ५.४.१-२, ७, १० पृ ३५१-३५३
२७. अथर्ववेद १९.३९.२ पृ १८३
२८. अथर्ववेद १९.३९.१ पृ १८०
२९. अथर्ववेद १९.३९.१० पृ १८४
३०. अथर्ववेद ५.५.१ - ४ पृ ३५४
३१. अथर्ववेद ५.२८.५ पृ ४४५
३२. अथर्ववेद ६.१६.३ पृ ४८०
३३. अथर्ववेद ६.११.१ पृ ४७३
३४. अथर्ववेद ६.३०.२ पृ ४९५
३५. अथर्ववेद ७.७४.१,३ पृ ६९७-६९८
३६. अथर्ववेद ७.७६.१ पृ ६९९
३७. अथर्ववेद ६.१३९.१ पृ ६२५
३८. अथर्ववेद ६.१३९.५ पृ ६२६
३९. अथर्ववेद ६.१०९.१-३ पृ ५८७-५८८

४०. अथर्ववेद ६.२१.३ पृ ४८५
४१. अथर्ववेद ६.९५.१ पृ ५७१
४२. अथर्ववेद ६.९५.३ पृ ५७१
४३. अथर्ववेद ६.४३.१ पृ ५११
४४. अथर्ववेद १९.३२.१-२ पृ
४५. अथर्ववेद १९.३२.२ पृ १६६
४६. अथर्ववेद ६.८५.१ पृ ५६०
४७. अथर्ववेद १०.३.१,१२ पृ २१३,२१६
४८. अथर्ववेद ८.२.६ पृ १०
४९. अथर्ववेद ८.२.२८ पृ १६
५०. अथर्ववेद ८.३.५ पृ १६
५१. अथर्ववेद ८.७.१४ पृ ५३
५२. अथर्ववेद १.२३.१ पृ ४३
५३. अथर्ववेद २.२५.२ पृ ११२
५४. अथर्ववेद २.२५.२ पृ ११२
५५. अथर्ववेद ८.७.२७ पृ
५६. अथर्ववेद २.८.१ पृ ८०
५७. अथर्ववेद २.८.३ पृ ५०
५८. अथर्ववेद ४.३७.५ पृ ३२९
५९. अथर्ववेद २.९.१ पृ ८१
६०. अथर्ववेद ४.३७.३ पृ ३२८
६१. अथर्ववेद ४.३७.४ पृ ३२९
६२. अथर्ववेद ५.५.५ पृ ३५५
६३. अथर्ववेद ८.२.१८ पृ १३
६४. अथर्ववेद ८.६.६,७,१८,१९ पृ ४२
६५. अथर्ववेद ६.१००.२ पृ ५७६
६६. अथर्ववेद १०.४.१-३ पृ २२२
६७. अथर्ववेद ४.७.१ पृ २४१
६८. अथर्ववेद १९.३४.५ पृ १७२

६९. अथर्ववेद १९.३४.१० पृ १७३
७०. अथर्ववेद १९.४६.१ पृ १९७
७१. अथर्ववेद १९.३६.६ पृ १७७
७२. अथर्ववेद ६.१६.२ पृ ४७९
७३. अथर्ववेद ६.१६.१ पृ ४७९
७४. अथर्ववेद ७.३८.२ पृ ६६०
७५. अथर्ववेद ८.७.१८ पृ ५५

**संदर्भ ग्रंथसूची :-**

1. देविसहाय पाण्डेय 'दीप';(२०२३); व्रजजीवन प्राच्यभारती ग्रन्थमाला २२७; *अथर्ववेद संहिता* , तृतीय खण्ड (अध्याय १-७); चोखम्बा संस्कृत प्रतिष्ठान दिल्ली; प्रथम सं.
2. देविसहायपाण्डेय'दीप'; (२०२३) व्रजजीवनप्राच्यभारतीग्रन्थमाला २२७; *अथर्ववेद संहिता* , तृतीय खण्ड (अध्याय ८-१७); चोखम्बा संस्कृत प्रतिष्ठान दिल्ली; प्रथम सं.
3. देविसहायपाण्डेय'दीप'; (२०२३) व्रजजीवनप्राच्यभारतीग्रन्थमाला २२७; *अथर्ववेद संहिता* , तृतीय खण्ड (अध्याय १८-२०); चोखम्बा संस्कृत प्रतिष्ठान दिल्ली; प्रथम सं.
4. डॉ. चंद्रकांत कुलकर्णी; (२००७) भारत स्वातन्त्र्य स्वर्णजयंती- ग्रंथमाला - ४०; *महाभारतस्य आयुर्वेददृष्ट्या अध्ययनम्*; राष्ट्रीय संस्कृत संस्थान; नवदेहली; प्रथम संस्करण.
5. गयाचरणत्रिपाठी;(२०११) *वैदिक देवता उद्भव और विकास*; राष्ट्रीय संस्कृत संस्थान; नवदेहली; द्वितीय संस्करण.
6. रामपद साम; (२०२५) अमृतमहोत्सव ग्रंथमाला ५७; *अथर्ववेदेभैषज्यविज्ञानम्*; केंद्रीयसंस्कृत विश्वविद्यालय, नवदेहली; प्रथम संस्करण.
7. online Amercosh :- https://surl.lt/ycnjpt
8. online Ashtadyayi :- https://ashtadhyayi.com/
9. उपाध्याय बलदेव ; (१९६७); *वैदिक साहित्य*; संस्कृत विश्वविद्यालय वाराणसी; परिवर्धित संस्करण.
10. शर्मा राममूर्ती; (१९८७); *वैदिक साहित्य का इतिहास*; ईस्टर्न बुक लिंकर्स दिल्ली; द्वितीय संस्करण.
11. भार्गव दयानंद ; (१९९६); *वेध विज्ञान वीथिका*; राजस्थानी ग्रंथागारजोधपूर; प्रथम संस्करण.